## पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे – ४११ ०१८.

## (महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल)

## सूचना

क्रमांकः- नरवि/कावि/३६/१२३/२०१९.

ज्याअर्थी, पिंपरी चिंचवड शहराची सूधारित विकास योजना महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, अधिसूचना क्र. टीपीएस-१८९३/१२७६/ प्र.क्र.-१७४/९३/नवि-१३, दिः- १८/९/१९९५ अन्वये व वगळलेल्या भागाची विकास योजना महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, निर्णय क्र. टिपीएस-१८९३/१२७६/प्र.क्र.१७३/९३/नवि-१३, दिः- ३०/९/१९९९ अन्वये मंजूर आहे. ( यापुढे "उक्त विकास योजना" म्हणून संबोधिलेली)

आणि ज्याअर्थी, उक्त विकास योजनेत मौजे पिंपळे गुरव येथील स.नं. ४६, ४७ व ४८ पैकी मधील १.०० हेक्टर क्षेत्र आरक्षण क्र. ३४४ अन्वये " शाळा व खेळाचे मैदान" या प्रयोजनासाठी व स.नं. ४६, ४५ व ४४ पैकी मधील १.५० हेक्टर क्षेत्र आरक्षण क्र. ३४४ अ अन्वये " पार्क" या प्रयोजनासाठी आरक्षित आहे. (यापुढे "उक्त जमीन" म्हणून संबोधिलेली)

आणि ज्याअर्थी, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने मा. महापालिका सभा ठराव क्र. ४२५, दिः- २०/०६/२०१९ अन्वये उक्त विकास योजनेतील उक्त जमिनीतील आ.क्र. ३४४ "शाळा व खेळाचे मैदान" आणि आ.क्र. ३४४ अ "पार्क" या आरक्षणांचे एकूण २.५० हेक्टर क्षेत्र " मनपा उपयोग " या प्रयोजनासाठी आरक्षित करण्याकामी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदलाची कार्यवाही करण्यास मान्यता प्रदान केली आहे. ( यापुढे "उक्त ठराव" म्हणून संबोधित केलेला)

आणि ज्याअर्थी, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने उक्त विकास योजनेतील उक्त जमिनीत उक्त ठरावानुसार आ.क्र. ३४४ "शाळा व खेळाचे मैदान" आणि आ.क्र. ३४४ अ "पार्क" या आरक्षणांचे एकूण २.५० हेक्टर क्षेत्र " मनपा उपयोग " या प्रयोजनासाठी आरक्षित करण्याकामी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम,

१९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदलाची कार्यवाही करण्याचे योजिले आहे. ( यापुढे "उक्त फेरबदल" म्हणून उल्लेख केलेला)

आणि त्याअर्थी, उक्त फेरबदल दर्शविणारा नकाशा नागरिकांच्या अवलोकनार्थ उपसंचालक, नगररचना, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे – ४११ ०१८ यांचे कार्यालयात कार्यालयीन वेळेत अवलोकनार्थ ठेवण्यात आलेला आहे.

उक्त प्रस्तावित फेरबदलाबाबत नागरिकांच्या काही हरकती अगर सूचना असतील तर त्या सदरची सूचना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात प्रसिध्द झालेच्या दिनांकापासून एक महिन्याचे आत लेखी स्वरुपात आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे – ४११ ०१८ यांचे कार्यालयाकडे पाठवाव्यात.

उक्त प्रस्तावित फेरबदलाबाबत विहित मूदतीमध्ये पिंपरी चिंचवड महापालिकाकडे प्राप्त झालेल्या हरकती / सूचनांचा विचार फेरबदलाचा प्रस्ताव शासनास मंजूरीसाठी सादर करण्यापुर्वी केला जाईल.

सही/-
( श्रावण हर्डीकर )
आयुक्त,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी, पुणे – ४११ ०१८.

ठिकाणः- पिंपरी
दिनांकः- ३०/०७/२०१९.
जाहिरात क्रमांक ४५३

(टिपः- सदर सूचना व फेरबदल दर्शक नकाशा पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या www.pcmcindia.gov.in या संकेतस्थळावर ही अवलोकनार्थ उपलब्ध आहे.)

PIMPRI CHINCHWAD MUNICIPAL CORPORATION

Modification u/s 37of Maharashtra Regional and Town Planning Act1966

Notice

No. TPS/WS/36/123/ 2019

Whereas, the revised Development Plan for Pimpri Chinchwad Municipal Corporation has been sanctioned by the Government of Maharashtra in Urban Development Department, vide Notification No.TPS-1893/1276/C.R.174/93/UD-13, dated 18th September,1995 and the Development Plan of Excluded Part by the Government of Maharashtra in Urban Development Department, vide Notification No.TPS-1893/1276/C.R.173/93/UD-13, dated 30th September,1999. (hereinafter referred to as the "said Development Plan.")

And whereas, in the said Development Plan land admeasuring about 1.00 Ha from S.No. 46, 47 & 48 has been reserved for "School & Play Ground" vide Site No. 344 and land admeasuring about 1.50 Ha from S.No. 46, 45 & 44 has been reserved for "Park" vide Site No. 344A from village Pimple Gurav. (hereinafter referred to as the "said Land.")

And whereas, the General Body of Pimpri Chinchwad Municipal Corporation has passed the resolution vide Resolution No.425, dated 20/6/2019 to initiate the modification procedure as laid down under section 37 of Maharashtra Regional & Town Planning Act 1996 to reserve area of 2.50 Ha of Site No. 344 "School & Play Ground" & Site No. 344 A "Park" of the said Land for the purpose of "Municipal Purpose" in the said Development Plan (hereinafter referred to as the "said Resolution. ")

And whereas, the Municipal Corporation now intends to initiate the modification procedure as laid down under section 37 of Maharashtra Regional & Town Planning Act, 1966 to reserve area of 2.50 Ha of Site No. 344 "School & Play Ground" & Site No. 344 A "Park" of the said Land for the purpose of "Municipal Purpose" as per the said Resolution, in the said Development Plan ( hereinafter referred to as the "said Modification. ")

And therefore, the copy of the said Modification is kept open for public inspection on all working days during office hours in the office of Deputy Director of Town Planning, Pimpri Chinchwad Municipal Corporation, Pimpri , Pune - 411 018 .

Any person having any suggestion and / or objection regarding the said Modification may file the same in writing to the Commissioner, Pimpri Chinchwad Municipal Corporation, Pimpri , Pune – 411 018 within a period of one month from the date of publication of this notice in the gazette of Maharashtra Government.

The suggestions and / or objections received within the stipulated period will be considered by the Municipal Corporation before submitting the proposal to the Government of Maharashtra for sanction.

Sd/-

x x x


( Shravan Hardikar)
Commissioner ,
Pimpri Chinchwad Municipal Corporation,
Pimpri, Pune-18

Place - Pimpri,
Date- 30/7/2019

Notice No 453

(Note: The said Notice & plan showing modification proposal is also available on the website of P.C.M.C. – www.pcmcindia.gov.in)

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११०१८
जून्या हद्दीचे सुधारित मंजूर विकास योजनेत
महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये प्रस्तावित फेरबदल.
फेरबदलाचा नकाशा
(मौजे - पिंपळे गुरव येथील आरक्षण क्र.३४४,३४४अ ~~जमिन~~ व सभोवतालचा परिसर)




(प्रमाण - १:५०००)

खुलासा:-

रहिवास विभाग

मंजूर विकास योजना आरक्षण

मंजूर विकास योजना रस्ते / रस्तारुंदी

महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल प्रस्ताव असे.
आरक्षण क्र.३४४ व ३४४अ या आरक्षणांचे क्षेत्र एकत्रित करुन आरक्षणाचे प्रयोजन "<u>मनपा उपयोग</u>" ( Muncipal Purpose ) असे करण्याबाबत.

उपसंचालक
नगररचना व विकास विभाग
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी,पुणे –४११०१८